# न्यायाधीश, कामगार न्यायालय, रत्नागिरी यांचे न्यायासनासमोर

**तक्रार (अ.का.प्र.) क्र. ९/२०१७**

**(सीएनआर नं:–MHLC08-000020-2017)**

**श्री. सदाशिव नारायण चव्हाण**
वय – ४१ वर्षे, व्यवसाय– नोकरी
रा. न्यु कुर्ले वसाहत, फोंडाघाट,
जि. सिंधुदूर्ग. .. तक्रारदार

विरूध्द

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**सिंधुदूर्ग विभाग, कणकवली,**
जि. सिंधुदूर्ग
करिता विभागीय वाहतुक अधिक्षक. .. सामनेवाला

कोरम :– श्रीमती अ. क. मांडवगडे, न्यायाधीश,

प्रतिनिधीत्व :– श्री. बी. डी. मनोळकर, तक्रारदारातर्फे वकील.
श्री. एस. एम. देसाई, सामनेवालातर्फे वकील.

## निशाणी यु. २ वर आदेश

(न्यायदान कक्षात दि. १८/०२/२०१९ रोजी जाहीर)

प्रस्तुतचा अर्ज महाराष्ट्र कामगार संघटनांना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा बंदी अधिनियम, १९७१ (ज्यास पुढे ‘उक्त कायदा’ असे संबोधण्यात आले आहे) चे कलम ३०(२) अन्वये अंतरिम दादीचा आहे.

LABOUR COURT

तक्रारदाराची बाजू अशी की ,

२. दि. २१/११/२००० पासून तक्रारदार सामनेवाला यांच्या आस्थापनेत वाहक म्हणुन कार्यरत आहे. त्यांचा पुर्वसेवाकाल चांगला आहे. तक्रारदार व सामनेवाला यांच्यात कामगार व मालक असे नातेसंबंध आहेत. सामनेवाला यांनी केलेल्या अनुचित प्रथांबाबत प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे. त्यातील मजकुर अर्जाचा भाग म्हणुन वाचण्यात यावा. तक्रारदारास सामनेवाला सेवेतुन बडतर्फ करतील अशी त्याला रास्त भिती वाटते. त्यामुळे सामनेवाला यांनी दिलेल्या बडतर्फीच्या कारणे दाखवा नोटीसला खुलासा सादर न करता प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे. त्यामुळे दि. २९/०३/२०१७ रोजीच्या बडतर्फीच्या कारणे दाखवा नोटीस आधारे प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सामनेवाला यांनी तक्रारदाराविरूध्द कोणतीही कारवाई करू नये तसेच अनुचित प्रथांचा अवलंब करण्यापासून सामनेवालास तात्पुरते परावृत्त करण्यात यावे अशी दाद मागितलेली आहे.

३. मुळ तक्रारीतील कथनानुसार दि. २३/१२/२०१६ रोजी तक्रारदार कार्यरत असलेली बस सातार्डे येथे तपासण्यात आली. तपासनिसांनी त्रुटी आढळल्याचे अहवालात नमुद केले. तक्रारदारास शिस्त व अपील कार्यपध्दतीच्या अनुसुची अ कलम ७ज, १०, १२ब, २२ व ४८ नुसारच्या गैरकृत्याकरिता दि. २६/१२/२०१६ रोजीचे आरोपपत्र देण्यात आले. सदरचे आरोपपत्र तपासनिसांच्या खोटया अहवालावर आधारीत आहे. आरोपपत्रात ठेवलेले आरोप खोटे व बिनबुडाचे आहेत. तक्रारदाराने कोणतेही गैरकृत्य केलेले नाही. दि. १८/०१/२०१७ रोजी तक्रारदाराने खुलासा सादर केला. खुलाशामध्ये तक्रारदाराने सत्य परिस्थिती कथन केली तसेच कोणत्या परिस्थितीत तक्रारदारावर तपासनिसांनी अधिकारांचा गैरवापर करुन खोटे आरोप ठेवले याचा खुलासा

LABOUR COURT

केला. परंतु तो गृहित न धरता खातेनिहाय चौकशी करण्यात आली. सदर बाब चौकशी अधिका–यांच्या निदर्शनास आणुन देण्याचा तक्रारदाराने प्रयत्न केला.

४. तपासनिसांनी सत्य परिस्थिती न पडताळता त्यांच्या मर्जीप्रमाणे व प्रवाशांवर दबाव आणुन त्यांचे जबाब लिहुन घेतले. तक्रारदारावर देखील दबाव आणुन त्याला जबाब दयायला सांगितला. तक्रारदाराला सविस्तर जबाब देवु दिला नाही. तपासनिसांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करुन खोटा बनाव रचला व अहवाल सादर केला. प्रवास भाडे वसुल केले नव्हते. तसेच तिकीटही दिले नव्हते. मात्र तपासनिसांनी खोटे रेकॉर्ड तयार करुन तक्रारदारास गोवले. बसमध्ये गर्दी असल्यामुळे तक्रारदाराकडुन चुक घडली. मात्र सत्यपरिस्थिती न पडताळता तपासनिसांनी खोटा अहवाल दाखल केला. त्यामुळे आरोपपत्रात ठेवलेले आरोप खोटे व बिनबुडाचे आहेत.

५. आरोपपत्रातील आरोप पाहता तक्रारदाराने दोन प्रवासी सोनाली गावंडी व मंदा कवठणकर यांना प्रवास भाडे वसुल न करता व तिकीट न देता सातार्डे येथे उतरेपर्यंत प्रवास करु दिला. प्रवासी रेश्मा कवठणकर यांना पेडणे ते तोरासे हा प्रवास १ रुपयाच्या सामानाच्या तिकीटावर करु दिला. मात्र त्या ज्या ठिकाणी चढल्या त्याचठिकाणी त्यांच्याकडुन रु. १४/– स्विकारले. तोरासे येथे नोंदविलेला जबाब तक्रारदाराकडे सावंतवाडी येथे सहीसाठी दिला असता त्यांनी तो फाडुन कागदपत्र नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तक्रारदाराने रु. १३/– चा अपहार केला. तसेच ख–या वस्तुस्थितीनुसार जबाब देण्यास नकार दिला. तक्रारदाराकडील रा. प. रक्कम रु. १३/– ने जास्त आढळली. त्यामुळे आरोपपत्र देण्यात आले.

६. तक्रारदाराच्या कथनानुसार बस तपासली त्यावेळी तक्रारदार योग्यरित्या तिकीट देण्याचे काम करत होता. संबंधित प्रवासी प्रवास भाडे न देता व तिकीट न देता प्रवास करत असल्यामुळे दोषारोपपत्रातील आरोप चुकीचे

आहेत. आरोपपत्रात नमुद केल्यानुसार तक्रारदाराने कोणतेही गैरकृत्य हेतुपुर्वक केलेले नाही. त्यामुळे आरोप चुकीचे व बेकायदेशीर आहेत. खोटया अहवालाच्या आधारे सामनेवाला यांनी कोणताही विचार न करता तक्रारदारास निलंबीत केले व नंतर आरोपपत्र दिले.

७. सामनेवाला यांनी अभियोक्ता तसेच न्यायाधीशाची भुमिका पार पाडली. चौकशी दरम्यान नैसर्गिक न्यायतत्वांचे पालन करण्यात आलेले नाही. घाईगर्दीने चौकशीचे कामकाज पुर्ण करण्यात आले. संबंधित प्रवाशांना तपासण्यात आलेले नाही. तक्रारदाराने प्रवासी श्रीमती रेश्मा कवठणकर यांना हजर ठेवले. मात्र नैसर्गिक न्यायतत्वांचा भंग करुन सदर प्रवाशाचा तक्रारदाराला सरतपास घेऊ न देता, उलटतपास घेवु दिला. तक्रारदारास चौकशी अधिका–यांनी सुचक प्रश्न विचारले. सक्षम अधिका–यांनी अंगिकारलेली प्रक्रिया बेकायदेशीर आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वांच्या विरुध्द आहे. केवळ दिखावा म्हणुन चौकशी पुर्ण करण्यात आली त्यामुळे चौकशी देखील बेकायदेशीर आहे. चौकशी दरम्यान आरोप सिध्द झालेला नाही. संबंधित प्रवाशांना चौकशीदरम्यान तपासण्यात आले नाही. महत्वाचे साक्षीदार तपासण्यात आले नाहीत. करण्यात आलेली चौकशी नैसर्गिक न्यायतत्वांनुसार नसुन बेकायदेशीर आहे. केवळ अहवालकर्त्यांना एकटयालाच तपासण्यात आले. अहवालकर्त्यांनी चौकशीदरम्यान अनेक बाबी मान्य केल्या.

८. तक्रारदाराने अपहार केलेला नाही. तसेच बेईमानी अथवा लबाडी करण्याचा प्रयत्न केलेला नाही. सदरची घटना केवळ एक चुक आहे व माणसाकडुन अशा चुका होणे स्वाभावीक आहे. त्यामुळे त्याला गैरकृत्य म्हणता येणार नाही. तक्रारदाराने घटनास्थळावरील जबाबात तसेच चौकशी दरम्यान सत्य परिस्थिती कथन करण्याचा प्रयत्न केला. मात्र सक्षम प्राधिका–यांनी पुरावा योग्यरित्या गृहित धरला नाही आणि आरोप सिध्द झाल्याचा निष्कर्ष काढला.

LABOUR COURT

त्यामुळे निष्कर्ष विपर्यस्त आहेत. तक्रारदाराच्या बाजुने आलेला पुरावा चौकशी अधिका–यांनी गृहित धरलेला नाही. तक्रारदाराच्या अपरोक्ष नोंदविलेले जबाब गृहित धरण्यात आलेले आहेत. निष्कर्ष काढण्यासाठी कोणताही ठोस पुरावा नव्हता. दि. ०६/०५/२००८ रोजी चौकशी पुर्ण करण्यात आली. मात्र त्या आधारे दि. २४/०३/२०१७ रोजी देवु केलेली शिक्षा नैसर्गिक न्यायतत्वांच्याविरुध्द आहे.

९. सामनेवालाने सदर निष्कर्ष तांत्रिकपणे स्विकारले व दि. २९/०३/२०१७ रोजीची बडतर्फीची कारणे दाखवा नोटीस दिली. बडतर्फ करण्याची कृती नैसर्गिक न्यायतत्वांच्याविरुध्द आहे. प्रस्तावित शिक्षा शिस्त व अपील कार्यपध्दतीच्या तरतुदींच्याविरुध्द आहे. शिक्षा देताना मागील सेवाकाल पाहणे आवश्यक आहे. तसेच प्रकरणाचे गांभिर्य पाहणे आवश्यक आहे. मात्र त्याचे पालन न केल्यामुळे सामनेवाला यांनी अनुचित प्रथांचा अवलंब केलेला आहे. गैरकृत्याचे स्वरुप व पुर्वसेवाकाल पाहता प्रस्तावित शिक्षा अवाजवी व धक्कादायक आहे. त्यायोगे सामनेवाला यांनी उक्त कायदयाच्या परिशिष्ठ ४ बाब १ग नुसार अनुचित प्रथांचा अवलंब केलेला आहे. सामनेवाला यांनी केलेली कारवाई सद्‌हेतुची नसुन अधिकारांचा गैरवापर करुन केलेली आहे. सकृतदर्शनी खोटया कारणासाठी व नैसर्गिक न्यायतत्वांचे उल्लंघन करुन कारवाई केली. तक्रारदाराची छळवणुक केली. त्यायोगे सामनेवाला यांनी उक्त कायदयाच्या परिशिष्ठ ४ बाब १ अ, ब, ड फ व ग नुसार अनुचित प्रथांचा अवलंब केला आहे. याहीपेक्षा गंभीर गैरकृत्य अनेक वेळा केलेल्या इतर वाहकांना सौम्य शिक्षा दिलेल्या आहेत. अशा प्रकारे तक्रारदारास बडतर्फीची शिक्षा प्रस्तावित करुन सामनेवाला यांनी त्याची छळवणुक केलेली आहे. त्यामुळे बडतर्फ करण्याचे योजुन सामनेवाला तक्रारदारावर अन्याय करत आहे.

LABOUR COURT

सामनेवालाची बाजू अशी की,

१०. सामनेवाला यांनी नि. सी—४ वर म्हणणे दाखल करून तक्रार व अर्जावर हरकत घेतलेली आहे. त्यांच्या कथनानुसार घटना घडल्याबाबतचा मजकुर तसेच आरोपपत्र देण्यात आले, खातेनिहाय चौकशी करण्यात आली व बडतर्फीची नोटीस देण्यात आली याबाबी बरोबर आहेत. परंतु सामनेवाला यांनी कोणत्याही अनुचित प्रथांचा अवलंब केलेला नाही. तक्रारदाराने त्याच्या चुकांबाबत नमुद केलेली कारणमिमांसा पटण्याजोगी नाही. तक्रारदाराने केलेले आरोप खोटे व खोडसाळ आहेत. चौकशीचे कामकाज महामंडळाच्या नियमांनुसार पुर्ण करण्यात आले. गुन्हयाचे स्वरूप व गांभीर्य पाहुन शिक्षा प्रस्तावित केलेली आहे. तक्रारदाराचा पुर्वसेवाकाल समाधानकारक होता ही बाब त्यांनी नाकारलेली आहे. प्रस्तुतची तक्रार बडतर्फीच्या कारणे दाखवा नोटीसला म्हणणे दाखल करण्यापुर्वी दाखल केल्याने अपरिपक्व आहे. आवश्यक असल्यास सामनेवाला यांना पुरावा देण्याची संधी देण्यात यावी.

११. त्यांच्या कथनानुसार दि. २३/१२/२०१६ रोजी पणजी सावंतवाडी मार्गावरील कामगिरीवर तक्रारदार कार्यरत असताना सातार्डा नैबाग येथे बस तपासण्यात आली. ती वेळी संध्याकाळी ६.०५ मिनीटांची होती. बसमधुन श्रीमती सोनाली गवंडी व मंदा कवठणकर या दोन स्त्री प्रवासी पेडणे टप्पा क्र. ७ ते सातार्ड नैबाग, टप्पा क्र. ६ असा विनामुल्य विनातिकीट प्रवास करताना आढळल्या तसेच अन्य महिला प्रवासी सौ. रेश्मा कवठणकर या तिकीट क्र. ०००३०८ मुल्य रु. १/— दराचे अतिरिक्त अधिभार म्हणजेच एक्स्ट्रा तिकीटावर टप्पा क्र. ७ पेडणे ते तोडसे टप्पा क्र. ४ असा प्रवास करताना आढळल्या. इन्सपेक्शन रिपार्टवरुन खात्री केली असता तिकीट अयोग्य असल्याचे आढळले. प्रवासी रेश्मा कवठणकर यांच्याकडुन तक्रारदाराने रु. १४/— प्रवास भाडे स्विकारुन त्यांना रु. १/— दराचे तिकीट देवुन

LABOUR COURT

रु. १३/— अपहार केल्याचे आढळुन आले. तपासणीवेळी ४६ अधिक २ हाफ अधिक २ विनामुल्य विना तिकीट व १ अयोग्य तिकीट असे ५१ प्रवासी होते. तक्रारदाराने सावंतवाडी येथे प्रवासी जबाबावर समक्ष म्हणुन सही करायला नकार दिला व तो जबाब फाडुन टाकला. काही तुकडे गाडीत फेकुन दिले एक तुकडा चावला. अशा प्रकारे तक्रारदाराने नियमबाहय अयोग्य तिकीट देवुन महामंडळाची व प्रवाशांची फसवणुक केली. अपहार लपविण्यासाठी वस्तुस्थितीनुसार जबाब दिला नाही. आराडाओरडा करुन मार्ग तपासणी कामात असहकार्य केले. त्यावरुन तक्रारदाराचा निष्काळजीपणा व हलगर्जीपणा दिसुन येतो. सदरचे कृत्य जाणुनबुजुन व हेतुपुरस्सर केलेले आहे.

१२. सुनावणीच्यावेळी आलेला पुरावा पाहता प्रवासी श्रीमती रेश्मा कवठणकर पेडणे येथे चढल्या व बसल्या ठिकाणीच वाहकाकडे रु. १५/— दिले. त्यांना पेडणे ते तोरसे या अंतराचे तिकीट रु. १४/— मुल्याचे ईटीआय मशीनमधील नित्याच्या मार्गाचे तिकीट देणे गरजेचे होते मात्र त्यांच्याकडे रु. १/— मुल्याचे मशीन मधील एक्स्ट्रा मधुन काढलेले तिकीट क्र. ००३०८ आढळुन आले. प्रचलित पध्दतीनुसार वाहक ज्या कर्तव्यावर कार्यरत असतात त्या मार्गाचे टप्पे/थांबे व त्यानुसार तिकीट मुल्य इत्यादी माहिती ईटीआय मशीनमध्ये समाविष्ट केलेली असते. त्यामुळे योग्य तिकीट देणे वाहकाचे कर्तव्य आहे. प्रवासी श्रीमती रेश्मा कवठणकर यांच्याकडे ०००३०८ या क्रमांकाचे मुल्य रु. १/— चे १८.०१.०३ वाजता एक्स्ट्रा मधुन काढलेले तिकीट आढळले. ते त्यांनी तपासणीकामी सादर केले. एक्स्ट्रामधील कमी मुल्याचे तिकीट का देण्यात आले याबाबतचा खुलासा करताना तक्रारदाराने स्टाफ कर्मचा—याकडील असलेले सामानाचे तिकीट दिले होते व ते श्रीमती रेश्मा कवठणकर यांनी घेतल्याचा युक्तीवाद केलेला आहे. सामानापोटी दिले जाणारे तिकीट प्रवासी किंवा स्टाफ कुणालाही दिले तरी त्यासाठी एक्स्ट्रामधील तिकीट देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

LABOUR COURT

१३. ईटीआय मशीनमध्ये रुट फिड केलेला नसेल तर एक्स्ट्रा या प्रणालीचा वापर करता येतो. त्यामुळे रुट फिड केलेला असल्यास एक्स्ट्रा प्रणालीचा वापर करण्याची तरतुद नाही. जर सदर तिकीट प्रवासी श्रीमती रेश्मा कवठणकर यांनी घेतल्याचे तक्रारदाराला ज्ञात होते तर त्यांच्याकडुन रु. १५/— स्विकारलेले असल्यामुळे त्यांना योग्य दराचे रु. १४/— तिकीट देणे वाहक या नात्याने तक्रारदाराचे कर्तव्य होते. श्रीमती रेश्मा कवठणकर यांच्याकडुन रु. १५/— घेतलेले नाही आणि ९/— रु. चे तिकीट दिले त्यांना रु. १/— चे एक्स्ट्रा मधुन तिकीट क्र. ०००३०८ दिले असे तक्रारदाराने जबाबात नमुद केलेले आहे. सदर जबाब मान्य केला तर तक्रारदाराने पैसे घेतले नव्हते तर रु. ९/— मुल्याचे व एक्स्ट्रा मधील रु. १/— मुल्याचे तिकीट देण्याचे कारण काय हे स्पष्ट होत नाही. तसेच सदर बाब मान्य केल्यास रु. ९/— मुल्याचे तिकीट संबंधित प्रवाशाकडे आढळणे गरजेचे होते मात्र तशी बाब निदर्शनास आलेली नाही. त्याबाबत खुलासा करताना चुकीने नमुद केल्याचे तक्रारदाराने सांगितले. तिकीट क्र. ३१० हे रु. १४/— मुल्याचे तिकीट वाहकाकडुन घेवुन संबंधित स्त्री प्रवाशांना दिल्यावर तक्रारदाराकडील रा. प. रक्कम बरोबर आढळली. त्यामुळे प्रवासी श्रीमती रेश्मा कवठणकर यांच्याकडुन तक्रारदाराने रु. १५/— स्विकारले होते हे सिध्द होते. तसेच तक्रारदाराचा अपहाराचा हेतु सिध्द होतो.

१४. तिकीट क्र. ३०३ हे रु. १/— मुल्याचे तिकीट एक्स्ट्रामधुन काढुन विक्री केल्याचे आढळले. त्याबाबत खुलासा करताना मशीन चेक करण्यासाठी तिकीट काढण्याचा खुलासा केलेला आहे. मात्र सावंतवाडी पणजी हा प्रवास पुर्ण करुन पणजी ते सावंतवाडी या प्रवासासाठी तक्रारदार कार्यरत होते. तिकीट क्र. ३०३ हे १७.५८.०६ वाजता मशीनमधुन काढलेले आहे. पणजी येथुन निघाल्यावर तिकीट क्र. २६४ हे पहिले तिकीट १६.५०.५६ वा. काढलेले असुन तिकीट क्र. ३०२ हे १७.४४.०५ वा. काढलेले आहे. त्यामुळे मशीन सुस्थितीत

LABOUR COURT

होती. अन्य प्रवाशांना देखील अशाच प्रकारे तिकीटे दिल्यामुळे ही बाब लपविण्याकरिता तक्रारदाराने तसा खुलासा केलेला आहे. एक्स्ट्रामधुन प्रत्येकी रु. १/— मुल्याचे याप्रमाणे रु. २/— तिकीटाची विक्री केल्याची बाब दुर्लक्षीत करणे महामंडळाच्या हिताचे नाही.

१५. तक्रारदाराने श्रीमती रेश्मा कवठणकर यांच्या जबाबावर तोरसे ते सावंतवाडी पर्यंत समक्ष म्हणुन स्वाक्षरी केलेली नाही. मात्र सावंतवाडी बसस्थानाकात आल्यावर तक्रारदाराला तपासनिसांनी जबाबावर सही करायला सांगितले. त्यावेळी त्यांनी आरडाओरडा केला व श्रीमती कवठणकर यांचा जबाब फाडला व १ तुकडा चावला. त्यावेळी सावंतवाडी आगारातील सहायक वाहतुक निरिक्षक श्री. एम. डी. वारंग व बसचालक श्री. डवरी उपस्थित होते. ते प्रकरणाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. त्यामुळे अपहार लपविण्यासाठी तपासणी कामात असहकार्य करुन व्यत्यय निर्माण केल्याचे सिध्द झाले.

१६. पेडणे येथे आठ प्रवासी बसले होते त्यातील ५ जणांना योग्य तिकीटे दिली. श्रीमती कवठणकर यांना एक्स्ट्रा मधुन अयोग्य तिकीट दिले व २ स्त्री प्रवासी विना मुल्य विना तिकीट आढळल्या यावरुन तक्रारदाराने तिकीट देण्याचे काम करताना अक्षम्य दुर्लक्ष केले तसेच महामंडळाच्या कामकाजात अपहाराच्या हेतुने अनास्था दाखविली. तक्रारदाराने त्याचे कर्तव्य तत्परतेने पार पाडले असते तर दोन स्त्री प्रवासी विनामुल्य विनातिकीट प्रवास करायला धजावल्या नसत्या. मात्र तक्रारदाराची तिकीट देण्याची कार्यपध्दती महामंडळाच्या हिताच्या दृष्टीने हानीकारक असल्याचे स्पष्ट होते.

१७. आरोपपत्र देवुन खातेनिहाय चौकशी करण्यात आली. चौकशी अंती तक्रारदार दोषी आढळल्याने दि. २९/०३/२०१७ रोजीची बडतर्फीची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. चौकशी दरम्यान पुरावा देण्याची संपुर्ण संधी देण्यात आली होती. चौकशी अंती काढलेला निष्कर्ष योग्य व कायदेशीर आहे.

LABOUR COURT

व्यवस्थापनाने अधिकारांचा गैरवापर केलेला नाही अथवा घाईगर्दीने कामकाज उरकलेले नाही. उलट तक्रारदाराला साक्षीदार उपस्थित ठेवण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली. कारणे दाखवा नोटीस दिली म्हणजे प्रमाद प्रकरणाची अंतिम कारवाई पुर्ण झाली असा अर्थ होत नाही. शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार प्रथम अपील व व्दितीय अपीलाची संधी देण्यात आलेली आहे. यापुर्वी तक्रारदारावर रा.प.रक्कम कमी/जादा आढळली, प्रवासी विनामुल्य विनातिकीट आढळले अशा प्रकरणी कारवाई झालेली असुन दि. ०८/०२/२००५ रोजी प्रवाशाकडुन रु. ६/— स्विकारुन तिकीट न देता तेवढया रा. प. रक्कमेचा अपहार केल्याप्रकरणी शिक्षा झालेली असुन दि. १९/०२/२००९ रोजी रु. १/— मुल्याच्या २ तिकीटांवर पेनाने रु. ९/— असे गिरवुन प्रवाशांना तिकीटे दिली व रु. १६/— अपहार केला, अशा प्रमादीय प्रकरणी शिक्षा केलेल्या आहेत. अशा परिस्थितीत बडतर्फीची कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. अशा वाहकाला रा. प. सेवेत ठेवणे हिताचे नाही. आवश्यक असेल तर पुरावा देण्याची महामंडळाला संधी देण्यात यावी.

१८. वरील परिस्थितीत उपस्थित होणारे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे :—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराने त्याची बाजू सकृत दर्शनी भक्कम असल्याचे शाबीत केले काय ? | नाही |
| २ | न्यायाचा तौलनिक कल कोणाच्या बाजूने झुकतो ? | सामनेवालाच्या बाजुने |
| ३ | अर्ज मंजूर अगर नामंजूर केल्यास कोणाचे अधिक नुकसान होईल ? | अर्ज मंजुर केल्यास सामनेवालाचे |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

LABOUR COURT

## <u>का र ण मि मां सा</u>

१९. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

२०. तक्रारदाराने दाखल केलेल्या न्यायनिर्णयातील मजकुराचा अर्थ बदलु नये याकरिता मजकुर इंग्रजीमध्ये जसाच्या तसा नमुद करत आहे.

२१. तक्रारदाराने पुढील न्यायनिर्णयांचा दाखला दिलेला आहे.

<u>**Jorsingh Govind Vanjari v/s Divisional Controller M.S.R.T.C., Jalgaon, decided on 06-12-2016**</u>. In which Hon'ble Supreme Court has held that,

*In order to deny gratuity to an employee, it is not enough that the alleged misconduct of the employee constitutes an offence involving moral turpitude as per the report of the domestic enquiry. There must be termination on account of the alleged misconduct, which constitutes an offence involving moral turpitude.*

<u>**Cantonment Executive Officer &… vs Vijay D.Wani &Ors. Decided on 16 April,2008.**</u> In which Hon'ble Supreme Court has held that,

"*Therefore, the ratio of all these cases is that a person cannot be a Judge in his own case. Once the disciplinary committee finds the incumbent guilty; they cannot sit in the judgement to punish the man on the basis of the opinion formed by them. The objectivity is the hall mark of a judicial system in our Country. The very fact is that the disciplinary committee who found the respondent (herein) guilty participated in decision making process for finding the respondent (herein) guilty and to dismiss him from service is bias which is apparent & real. Consequently, the view taken by the Division Bench of the High Court cannot be faulted.*"

LABOUR COURT

## <u>मुददा क्र. १ ते ३</u>

२२. बस तपासण्यात आली होती व त्यात त्रुटी आढळल्या ही बाब दोन्ही बाजुंना मान्य आहे. दाखल केलेली कागदपत्रे पाहता तक्रारदाराविरूध्द शिस्त व अपिल कार्यपध्दतीच्या अनुसुचि अ कलम ७ज, १०, १२ब, २२ व ४८ नुसार आरोप ठेवण्यात आलेले आहेत. तक्रारदाराने दि. १८/०१/२०१७ रोजी आरोपपत्राचा खुलासा सादर केलेला आहे. एकंदर अभिलेख पाहता सकृत दर्शनी हे स्पष्ट होते की, तक्रारदाराला आरोपपत्र देण्यात आले, त्याने खुलासा सादर केला व त्यानंतर खातेनिहाय चौकशी करण्यात आली व चौकशीअंती आरोप सिध्द झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. सदर निष्कर्षाच्या आधारे सामनेवाला यांनी तक्रारदारास बडतर्फीची कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

२३. आरोपपत्राला दिलेल्या खुलाशात तक्रारदाराने आरोप अमान्य केले व समक्ष सुनावणीची मागणी केली. आरोपपत्राला दिलेला खुलासा पाहता तक्रारदाराने त्यात अहवाल वस्तुस्थितीला धरुन नाही. त्याचे म्हणणे ऐकुन न घेता हवा तसा अहवाल तयार केला व संबंधितांचे जबाब घेतले. तक्रारदाराला त्याच्या म्हणण्याप्रमाणे जबाब लिहुन देण्यास मज्जाव केला. गाडीत प्रवाशांची गर्दी होती. ती बाबही लक्षात घेतली नाही. त्यामुळे आरोप अमान्य केले.

२४. तक्रारदारातर्फे युक्तीवाद करण्यात आला की, आरोपत्रावरुन स्पष्ट होते की, विनामुल्य विनातिकीट प्रवासी आढळुन आले. त्यामुळे कलम ७ज नुसार कमी मुल्याचे तिकीट देणे हा आरोप सिध्द होत नाही. आरोपपत्रात निष्काळजीपणामुळे गैरकृत्य घडल्याचे म्हटलेले आहे. तसेच तक्रारदाराकडे जादा रक्कम आढळुन आलेली नाही. त्यामुळे अपहाराचा प्रश्न उद्भवत नाही. जर रु. १४/— चे तिकीट दिले नव्हते तर तपासनिसांनी रु. १४/—चे तिकीट देणे आवश्यक होते मात्र त्यांनी रु. १३/— चे तिकीट दिले. बसमध्ये गर्दी होती

त्यामुळे सदरची घटना निष्काळजीपणाने घडल्याचे स्पष्ट होते. एकंदर परिस्थिती पाहता श्री. वारंग यांच्या उपस्थितीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होते. आरोपपत्रात ठेवलेली कलमे व आरोपांचे अभिकथन यामध्ये तफावत आहे. तक्रारदाराची बदली केलेली आहे त्यामुळे त्याची छळवणुक केल्याचे स्पष्ट होते. चौकशी अधिका—यांनी अभियोक्ता तसेच न्यायाधीशाची भुमिका पार पाडलेली आहे. त्यामुळे जोरसिंग वंजारी या प्रकरणातील निर्देश येथे लागु होतात. याउलट सामनेवाला तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, गैरकृत्यावरुन बेईमानी सिध्द झालेली आहे. सदरचे गैरकृत्य चौकशी अंती सिध्द झालेले आहे. अफरातफर केल्याचे जरी सिध्द झाले नाही तरी बेईमानी सिध्द झाल्यामुळे कलम १२ब लागु होते व अशा वाहकाला नोकरीत ठेवणे महामंडळाच्या हिताचे नाही.

२५. एकंदर अभिलेख पाहता हे सकृतदर्शनी दिसुन येते की, तक्रारदारावर कमी मुल्याची तिकीटे देणे, लबाडी, बेईमानी तसेच महामंडळाचा कोणताही कागद, दप्तर किंवा मालमत्ता यात खोटेपणा करणे अनधिकृत फिरवाफिरव करणे किंवा ते नष्ट करणे यासारखे गंभीर आरोप ठेवण्यात आलेले आहेत. खातेनिहाय चौकशीचे कामकाज पुर्ण करण्यात आले व त्यानंतर तक्रारदारास बडतर्फीची कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. मात्र त्याचा खुलासा सादर न करता प्रस्तुत तक्रार दाखल केलेली आहे. निश्चीतच तक्रारदारास अशी तक्रार दाखल करण्याचा अधिकार आहे मात्र एकंदर कागदोपत्री पुराव्यावरुन सकृतदर्शनी दिसुन येते की, तक्रारदारास चौकशीदरम्यान बचावाची पुर्ण संधी देण्यात आली होती. प्रवासी रेश्मा कवठणकर यांना रु. १/— दराचे एक्स्ट्रामधील तिकीट क्र. ३०८ दिल्याचे तक्रारदाराने घ टनास्थळावरील जबाबात नमुद केलेले आहे. चुकीने सदर घटना घडल्याचे तक्रारदाराने नमुद केलेले आहे. सकृतदर्शनी चौकशी अंती तक्रारदारावरील आरोप सिध्द झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. सदर निष्कर्षांच्या आधारे बडतर्फीची कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

LABOUR COURT

२६. चौकशी अधिका—यांमुळे तक्रारदारावर कशा प्रकारे अन्याय झाला त्याचा स्पष्ट खुलासा तक्रारदाराने केलेला नाही. अशा परिस्थितीत चौकशी अधिका—यांनी न्यायाधीश व अभियोक्ता यांची भुमिका पार पाडल्यामुळे चौकशीच बेकायदेशीर आहे या तक्रारदाराच्या युक्तीवादात सकृतदर्शनी तथ्य नाही.

२७. खातेनिहाय चौकशी करण्यात आल्याचे दिसुन येते. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वांचे पालन न करता कारवाई केली असे सकृत दर्शनी म्हणता येणार नाही. घटना घडल्याचे म्हणजेच बस तपासण्यात आली व त्रुटी आढळल्या ही बाब तक्रारदाराने मान्य केलेली आहे. त्यामुळे खोटया कारणासाठी कारवाई केली असे सकृतदर्शनी म्हणता येणार नाही. तसेच तक्रारदाराची छळवणुक केली असे देखील सकृतदर्शनी दिसुन येत नाही. तक्रारदाराविरूध्द सिध्द झालेले आरोप पाहता सदर आरोप कीरकोळ व तांत्रिक स्वरूपाचे आहेत असे सकृतदर्शनी म्हणता येणार नाही. तक्रारदारावर अपहारासारखा गंभीर आरोप आहे. त्यामुळे सकृतदर्शनी तक्रारदाराची बाजु भक्कम आहे असे म्हणता येणार नाही. सकृतदर्शनी तक्रारदाराने यापुर्वी असे गैरकृत्य केल्याचे दिसुन येते त्यासाठी त्याला शिक्षादेखील देण्यात आल्याचे दिसुन येते. त्यामुळे न्यायाचा तौलनीक कल देखील तक्रारदाराच्या बाजुने नाही. केवळ तक्रारदार सेवेत आहे म्हणुन अंतरिम अर्ज नामंजुर केल्यास त्याची अपरिमीत हानी होईल या युक्तीवादात तथ्य नाही. उलटपक्षी गंभीर आरोप असलेल्या व महामंडळाचा विश्वास गमावलेल्या वाहकाला सेवेत राहु दिल्यास महामंडळाची अपरिमीत हानी होईल या सामनेवालाच्या युक्तीवादात तथ्य आहे. त्यामुळे अर्ज मंजुर केल्यास सामनेवाला यांचे नुकसान होईल.

२८. सामनेवाला यांनी उक्त कायदयाच्या परिशिष्ठ ४ बाब १ नुसार कामगार विषयक अनुचित प्रथांचा अवलंब केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत

नाही. त्यामुळे मी मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर सामनेवालाच्या बाजुने नोंदवित आहे.

२९. मुदद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र कामगार संघटनाना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा बंदी अधिनियम, १९७१ चे कलम २८ (८) अन्वये असे घोषित करण्यात येते की, हा आदेश दि. ०५/०३/२०१९ रोजीपासून अंमलपात्र राहील.

(श्रीमती अ. कृ. मांडवगडे)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, रत्नागिरी

दिनांक :– १८/०२/२०१९

LABOUR COURT